**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत**
**विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड करणेबाबत.**
**तांत्रिक व आर्थिक मापदंड, मार्गदर्शक सूचना देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र. २८/रोहयो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०११.

**वाचा :** १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५
२) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.३५/रोहयो-१ दि. ९ डिसेंबर, २०१०
३) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.११४/रोहयो-१ दि. २२ फेब्रुवारी, २०११
४) शासनपत्र क्र मग्रारो-२०११/प्र.क्र.१०/रोहयो-१ दि. १४ फेब्रुवारी, २०११
५) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मजुरी-२०११/प्र.१५/मग्रारो-१,दि.१९/३/२०११
६) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारो-२०११/प्र.२८/मग्रारो-१,दि.९/५/२०११
७) शासन परिपत्रक नियोजन विभाग क्र. मग्रारो-२०११/प्र.३७/रोहयो-१, दि.३०/६/२०११

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ व दि. ९ मे, २०११ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विखुरलेल्या स्वरुपात उंच रोपांची लागवड करणेबाबत. तांत्रिक व आर्थिक मापदंड, मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय दि. २२ फेब्रुवारी, २०११ अन्वये १८ महिने वयोमानाची उंच व सदृढ, दर्जेदार व निवडक रोपांची लागवड करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान संदर्भाधीन शासन परिपत्रक दिनांक ३० जून, २०११ अन्वये सामाजिक वनीकरण विभागाकडे १८ महिन्याची रोपे उपलब्ध नसल्यामुळे ९ महिन्यांच्या रोपांची लागवड करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, शासनाकडे १८ महिन्यांच्या रोपांची मागणी वारंवार होत असल्यामुळे शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत संदर्भीय शासन निर्णयान्वये १८ महिने वयोमानाची उंच व सदृढ, दर्जेदार व निवडक रोपांची लागवड करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. तथापि, १८ महिन्यांची विशिष्ट जातीची / प्रकारची सदृढ रोपे सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिकेत उपलब्ध नसल्यास उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांच्याकडून रोपे उपलब्ध नसल्याबाबतचा दाखला तात्काळ घेऊन, सामाजिक वनीकरणाने निश्चित केलेल्या दराने ग्रामपंचायत अथवा खाजगी रोपवाटिकेतून रोपे खरेदी करण्यास शासन मान्यता देत आहे.

...... २

२. उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग यांनी ३ दिवसात रोप अनुपलब्धतेबाबत दाखला देणे बंधनकारक राहिल. तसेच याबाबत त्यांनी ग्रामपंचायतींना आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

३. ग्रामपंचायत/खाजगी रोपवाटीकेतून खरेदी केलेल्या रोपांचा दर्जा योग्य राहिल याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची राहिल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201109171054190001 हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. गिरीराज

**( व्ही. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो) नियोजन विभाग.**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,